**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**

**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, उत्तमनगर सिडको,**

**नाशिक- ४२२००८**

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

---

## वार्षिक नियमित उपक्रम अहवाल २०२०-२१

**माहे जुन २०२० –**

०५ जुन २०२० रोजी जिल्हा समन्वयक श्री. रवींद्र अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली एकदिवसीय पर्यावरण जनजागृती कार्यशाळा घेण्यात आली. यात मराठा विद्या प्रसारक संस्थेमधील ३४ कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.

**माहे जूलै २०२० –**

१ ते ७ जुलै २०२० या कालावधीत महाविद्यालय परिसरात वन महोत्सव साजरा करण्यात आला महाविद्यालय परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. या आठवड्यात महाविद्यालयाच्या आजूबाजूच्या परिसरात विद्यार्थ्यामार्फत वृक्षरोपण करण्यात आले यात ५० वेगळ्या प्रजातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. जागतिक लोकसंख्या दिनाविषयी स्वयंसेवकांना माहिती देण्यात आली.

**माहे ऑगस्ट २०२० –**

दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत महाविद्यालयातील 'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान पंधरवाडा' साजरा करण्यात आला या पंधरवाड्या निमित्त महाविद्यालयात तसेच महाविद्यालयीन परिसरात वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये स्वच्छतेच्या शपथेने पंधरवड्यातील उपक्रमास सुरुवात करण्यात आली तर पुढे महविद्यालयातील परिसरातील स्वच्छता मोहीम त्यांतर्गत सिडको परिसरातील राजे छत्रपती संभाजी क्रीडा संकुलात श्रमदान करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय योजनेचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदविला, तसेच महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्यांनी स्वच्छता अभियानासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

१२/०८/२०२० ते १८/०८/२०२० या आठवड्यामध्ये कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नाशिक आणि जिल्हा रुग्णालय नाशिक यांच्या संयुक्त विदमाने जागतिक एडस दिन सप्ताह साजरा करण्यात आला आणि पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

**माहे सप्टेंबर २०२०** –

दि. ०१ सप्टेंबर २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नाशिक महानगरपालिका आयोजित 'गणेश मूर्ती दान' या उपक्रमात सहभाग नोंदवून गणेश विसर्जनाच्या दिवशी गणेश मूर्तींचे विसर्जन न करता ती दान करावी पर्यावरणाच्या संवर्धन करावे. याची जनजागृती करत, गणेश मूर्ती संकलनामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवकांनी दर वर्षी प्रमाणे आपले योगदान दिले. या उपक्रमामध्ये महाविद्यालय सातत्याने उत्कृष्ट काम करते. २४ सप्टेंबर २०२० रोजी गुगल मीट च्या माध्यमातून online कार्यक्रम ठेवण्यात आला यामध्ये ९१ स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी श्री. रविराज वटणे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. जे.डी. सोनखासकर होत्या.

१५ सप्टेंबर २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने माझे कुटुंब माझी जबाबदारी या उपक्रमाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांनी यात सहभागी होत कुटुंब सर्वक्षण, मास्क , सानिटाईझर वाटप, कोरोना जनजागृती इत्यादी कामे केली.

१५ सप्टेंबर २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान या विषयावर गुगल मीट च्या माध्यमातून online कार्यक्रम ठेवण्यात आला यात होंडा ग्रुप चे स्वप्नील झावरकर यांनी मार्गदर्शन केले.

**माहे ऑक्टोबर २०२०** –

२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधीजींची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली.

१२ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले यामध्ये २७ रक्तदाते सहभागी झाले होते. यानंतर सर्व रक्तदात्यांना प्राचार्य डॉ. जे.डी. सोनखासकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.

३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. यादिवशी महाविद्यालय परिसरात एकता शपथ घेण्यात आली.

**माहे नोव्हेंबर २०२०** –

दि. २६ नोव्हेंबर २०२० रोजी गुगल मीट च्या माध्यमातून online कार्यक्रम ठेवण्यात आला महाविद्यालात 'संविधान दिन' साजरा करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. सोनखासकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय पद भूषविले व श्री. शिवाजी गांगुर्डे यांनी उपस्थितांना संविधान दिनाचे महत्व सांगून मार्गदर्शन केले.

०६ नोव्हेंबर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जिल्हा स्तरीय SRD/NRD निवड शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात जिल्ह्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयातून स्वयंसेवक उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाकडून अभिमन्यू डोंगरे उपस्थित होते.

२०/११/२०२० ते २९/११/२०२० या कालावधी मध्ये विभागस्तरीय SRD/NRD निवड शिबिरामध्ये महाविद्यालयाकडून कु. जोस्त्ना कदम हिने सहभाग नोंदविला.

**माहे डिसेंबर २०२०** –

०१ डिसेंबर रोजी राष्ट्रीय एड्स दिन पार स्वयंसेवकांनी ऑनलाइन पोस्टर्स बनवून ती प्रसिद्ध करण्यात आली, सोशल मिडिया वापर करून या वेळी राष्ट्रीय एड्स दिन पर स्व्यंसेवकांनी जन जागृती केली.

**माहे जानेवारी २०२१** –

०१/०१/२०२१ ते २९/०१/२०२१ या कालावधी मध्ये NRD निवड शिबिरामध्ये महाविद्यालयाकडून कु. जोस्त्ना कदम हिने सहभाग नोंदविला.

महाविद्यालयाकडून कु. जोस्त्ना कदम हिने सर्व स्तरावरून निवड होत राष्ट्रीय पथ संचालनात सहभाग नोंदिवला आणि राजपथवर संचालन करण्याचा मान मिळवला.

**माहे फेब्रुवारी २०२१** –

भारतामध्ये सुरू झालेल्या कोविड 19 (कोरोना) च्या विरुद्ध लढा देण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या लसीकरण मोहिमीची जन जागृती स्वयंसेवकांनी केली तसेच वय वर्ष 60 च्या पुढील आपल्या घरातील आणि शेजारील व्यक्तींना लसीकरण करण्यासाठी प्रवृत्त करण्याचे काम ही स्वयंसेवकांनी पार पाडले.

**माहे मार्च २०२१** –

राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) युनिट च्या भारताच्या स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्धापन दिन आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या स्वातंत्र्याच्या निमित्ताने ऑनलाइन क्विझ आयोजित केली . प्रश्नावली म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य संघर्षाचे खरे शिल्पकार म्हणजेच गणेश सावरकर, विठ्ठल शिंदे, अनंत कान्हेरे, अरुणा असफ अली, राम प्रसाद बिस्मिल, शिवाराम राजगुरू इ. यांच्या जीवन-चारित्र्यावर प्रश्न विचारण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे वर्षभर आयोजित या नियमित कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग जिल्हा समन्वयक प्रा. रवींद्र अहिरे, कार्यक्रम अधिकारी प्रा.रविराज वटणे प्रा. वर्षा शिरोरे यांनी उत्सफुर्तपणे सहभाग घेतला तसेच प्रा. सोमनाथ घुले सरांचे विशेष मार्गदर्शन लाभले, या सर्व नियमित कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्या डॉ. जे.डी.सोनखासकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच स्वयंसेवकांच्या उत्तम प्रतिसादामुळे सन २०२०-२०२१ वर्षातील सर्व नियमित कार्यक्रम उत्तमरीतीने पार पडले

**(प्रा.रविराज वटणे )**
**रा.से.यो**
**कार्यक्रम अधिकारी**

M.V.P.Samaj's K.S.K.W. Arts, Science and Commerce College
Uttamnagar
CIDCO, Nashik.
422008

**(डॉ. जे.डी.सोनखासकर)**
**प्राचार्य**